जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUL 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात उद्या ज्वेलरी डिझाईनिंग कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शनिवारी (ता. १३) सकाळी अकरा वाजता तंत्रज्ञान अधिविभागाच्या सभागृहात कॅड अथवा कॅम व थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञान वापरून ज्वेलरी डिझाईनिंग करण्याबाबत विशेष कार्यशाळा आयोजित केली आहे. ज्वेलरी डिझाईन तज्ज्ञ सुहास हजारे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली, बी. टेक. मेकॅनिकल अभियांत्रिकीचे समन्वयक डॉ. अजित कोळेकर मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUL 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या ज्वेलरी डिझायनिंगवर एकदिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात शनिवारी (दि.१३) कॅड-कॅम व थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञान वापरून ज्वेलरी डिझायनिंग करण्याबाबत विशेष एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाचे इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल, हुपरी चांदी हस्तकला उद्योग विकास फाऊंडेशन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजेस् आणि एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा होत आहे. शनिवारी सकाळी ११ वाजता तंत्रज्ञान अधिविभागाच्या सभागृहामध्ये कार्यशाळेचे उद्घाटन होईल.

याप्रसंगी ज्वेलरी डिझाईन तज्ज्ञ सुहास हजारे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली, बी.टेक. मेकॅनिकल अभियांत्रिकीचे समन्वयक डॉ. अजित कोळेकर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी
12 JUL 2024


# ७० हजारांवर मुलींना मिळणार मोफत उच्च शिक्षण!

## शिवाजी विद्यापीठासह पॉलिटेक्निक कॉलेजचा समावेश; यावर्षीपासून अंमलबजावणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

उच्च शिक्षण घेणाऱ्या शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांसह व पॉलिटेक्निक महाविद्यालयांतील सुमारे ७० हजारांहून अधिक मुलींना शासनाच्या माध्यमातून आता मोफत शिक्षण मिळणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सुरू होणार आहे.

बारावीनंतर आर्थिक अडचणीमुळे अनेक मुलींना अर्धवट शिक्षण सोडून द्यावे लागते. उच्च शिक्षणाचा खर्च परवडत नसल्याने अनेक पालक बारावीनंतर मुलींचे लग्न लावून देतात. त्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या कमी होत असल्याचे चित्र समोर आले आहे. राज्य सरकारने मुलींच्या उच्च शिक्षणासाठी मोठे पाऊल उचलले आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या राज्यभरातील २० लाख मुलींना शासनाच्या माध्यमातून आता मोफत शिक्षण दिले जाणार आहे. त्यात अभियांत्रिकी, वैद्यकीय, औषधनिर्माशास्त्रसह ६४२ कोर्सेसचा समावेश आहे. यासाठी राज्य सरकार दरवर्षी १८०० कोटी रुपयांचा आर्थिक भार उचलणार आहे.



### विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालये

| | |
|---|---|
| अभियांत्रिकी, आर्किटेक्ट | २५ |
| औषधनिर्माशास्त्र (फार्मसी) | १५ |
| एमबीए, एमसीए महाविद्यालये | १६ |
| शिक्षणशास्त्र महाविद्यालये | ३६ |
| विधी महाविद्यालये | ०९ |
| बीबीए, बीसीए, बीबीएम महाविद्यालये | ३५ |
| बी.व्होक महाविद्यालये | ४४ |

उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना मोफत शिक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे; मात्र यात पारंपारिक बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.ए., एम.एस्सी. अभ्यासक्रमांचा समावेश नाही. पारंपरिक अभ्यासक्रमांचे शिक्षण मोफत करावे, अशी मागणी विद्यार्थिनींतून होऊ लागली आहे.

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुमारे २८९ महाविद्यालये आहेत. यात अनुदानित १३८, तर व्यावसायिकची अनुदानित १५, विनाअनुदानित ७६ महाविद्यालयांचा समावेश आहे. कोल्हापूर जिल्ह्यात शासकीय व खासगी तंत्रनिकेतन महाविद्यालयांची संख्या २० असून, त्यामधील सुमारे ६ हजारांहून अधिक विद्यार्थी आहेत. मोफत उच्च शिक्षणाचा लाभ पॉलिटेक्निकमधील सुमारे २ ते ३ हजार मुलींना होणार आहे. त्यामुळे आता हुशार असूनही आर्थिक अडचणीमुळे उच्च शिक्षण घेता येत नव्हते, ही मुलींची अडचण दूर होणार आहे.

12 JUL 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'डिस्टन्स'चे एमबीए, एम.एस्सी मॅथस्ही आता ऑनलाईन

- शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण विभागाचा पुढाकार
- दरवर्षी दहा हजार विद्यार्थी 'डिस्टन्स एज्युकेशन'मुळे प्रवाहात

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिक्षणापासून वंचित नोकरदार, गृहिणी आदी घटकांना शिक्षण मिळावे म्हणून शिवाजी विद्यापीठांतर्गत दूरशिक्षण केंद्राची स्थापना झाली. या केंद्रांतर्गत तिन्ही जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांत हजारो विद्यार्थी शिक्षण घेतात. एम.बी.ए. व एम.एस्सी. मॅथ्स अभ्यासक्रम ऑनलाईन आहे. परंतु इतर अभ्यासक्रमाचे शिक्षण ऑडीओ व व्हिडीओतून केले जात आहे. विद्यार्थ्यांना लॉगईन आयडीमधून व्हिडीओ, ऑडीओ पाहता, ऐकता येणार आहे. याचा फायदा होत असल्याने विद्यार्थी संख्येत वाढ होत आहे.



दूरशिक्षण केंद्रांतर्गत दरवर्षी जवळपास १० हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.एस्सी गणित असे १२ अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाते. ऑनलाईन एम.बी.ए.चे प्रवेशही वाढत आहेत. यामध्ये इंटरनॅशनल मॅनेजमेंट, इंटरनॅशनल कंपनी एचआर मॅनेजमेंटसारखे विषय शिकवले जातात. हा अभ्यासक्रम पूर्णपणे ऑनलाईन असून प्रवेशापासून ते परीक्षेपर्यंत सर्वच प्रक्रिया ऑनलाईन झाली आहे. फावल्या वेळेत अभ्यास करून परीक्षा द्यावी लागते. अभ्यासक्रमाच्या नोटस् लॉगईन आयडीवर पाठवल्या जातात. आयटी क्षेत्रात नोकरी करणाऱ्यांची ऑनलाईन एम.बी.ए.ला जास्त पसंती आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास नॅशनल, इंटरनॅशनल कंपन्यांमध्ये मोठ्या पदाची नोकरीची संधी आहे. दूरशिक्षणच्या अभ्यासक्रमांना युजीसीकडून पाच वर्षाची मान्यता मिळाली आहे. परिणामी, यंदा कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम सुरू करण्यास विद्यापीठ प्रशासनाने प्राधान्य दिले आहे. यामध्ये एम.बी.ए. एम.एस्सी मॅथस्चा समावेश आहे. युजीसीच्या सुचनांप्रमाणे अनेक उपक्रम व अभ्यासक्रम राबवण्याचे प्रस्तावित आहे. विद्यार्थ्यांचा व्हॉटसॲप ग्रुप तयार करून अभ्यासक्रमाची संपूर्ण माहिती ग्रुपवर दिली जाते. प्रॅक्टिकल कसे व कधी महाविद्यालयाकडे सादर करायचे, याच्या सुचनाही ऑनलाईन दिल्या जातात. विद्यार्थ्यांना लॉगईन आयडीमधून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करता येते. प्रवेश शुल्कही ऑनलाईन भरण्याची सुविधा उपलब्ध केली आहे.

### शिक्षणापासून वंचितांना मिळतेय शिक्षण

दूरशिक्षण विभागातील अभ्यासक्रमाला ऑनलाईन प्रवेश घेतल्यानंतर ज्या कॉलेजला प्रवेश घेतला आहे. त्या कॉलेजला एक प्रत जमा करायची आहे. शिक्षणापासून वंचित असलेले सैनिक, व्यावसायिक, गृहिणी जास्तीत जास्त प्रवेश घेतात. सर्व सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जातात, परंतु परीक्षा मात्र ऑफलाईन घेतली जाते. दूरशिक्षणमुळे समाजातील हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येत आहे.

**डॉ. डी. आर. मोरे (समन्वयक, दूरशिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ)**

### दूरशिक्षण १२ अभ्यासक्रमासाठी ८३ सेंटर

दूरशिक्षण विभागांतर्गत तिन्ही जिल्ह्यात ८३ महाविद्यालयांवर दूरशिक्षण विभागाची सेंटर आहेत. या सेंटर अंतर्गत १२ अभ्यासक्रम शिकवले जातात. विद्यार्थ्यांना आलेल्या शंकांचे निरसन ऑनलाईन केले जाते. ऑनलाईन कार्यशाळाही घेतल्या जातात. प्लेसमेंटची माहितीही ऑनलाईन दिली जात असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

12 JUL 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

समाजाच्या विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या ११ कर्तृत्ववान महिलांचा दैनिक 'पुढारी'च्या वतीने विशेष सन्मान सोहळा आज (दि. १२) रोजी आयोजित केला आहे. महाराणी ताराराणीच्या पराक्रमाचा वारसा सांगणाऱ्या कोल्हापुरातील महिला आज विविध क्षेत्रांत आपले कर्तृत्व गाजवत आहेत. त्यामधील प्रातिनिधिक अशा ११ महिलांची निवड यावर्षी महिला दिनानिमित्त दैनिक 'पुढारी'च्या वतीने करण्यात आली होती. त्यांचा या विशेष सोहळ्यात कोल्हापूर महानगरपालिकेच्या प्रशासक मा. के. मंजूलक्ष्मी यांच्या हस्ते सन्मान करण्यात येत आहे. समाजाच्या विविध क्षेत्रांना आत्मविश्वासाने गवसणी घालणाऱ्यांचा प्रेरणादायी आदर्श समाजासमोर ठेवावा यासाठी दै. 'पुढारी'च्या वतीने हा कार्यक्रम पुढारी वुमेन्स आयकॉन या उपक्रमांतर्गत आयोजित केला आहे.



## डॉ. अंजली निगवेकर

कोल्हापूरच्या संगीत क्षेत्रात आदराने घेतले जाणारे नाव म्हणजे डॉ. अंजली निगवेकर. शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागात ३० वर्षे अध्यापनाचे काम त्यांनी केले. या विभागाच्या विभागप्रमुख म्हणून त्या निवृत्त झाल्या. त्यांनी संगीतात एम.ए. आणि पीएच.डी. प्राप्त केली. रवींद्रनाथ टागोर यांच्या 'गीतांजली'तील रचनांचे सादरीकरण तसेच 'गीतांजली'तील मराठी अनुवादित कवितांचे सादरीकरण केले. संत सूरदास यांच्या निवडक भजनांचे सादरीकरण केले. त्यांच्या संगीत क्षेत्रातील कार्यासाठी त्यांना विविध पुरस्कार मिळाले आहेत. दृष्टिहीन असताना त्यांनी केलेले काम डोळस व्यक्तीला लाजवेल असे आहे. कोल्हापुरातील या प्रेरणादायी महिला व्यक्तिमत्त्वाला सन्मानित करताना आम्हाला विशेष आनंद होतोय.

## डॉ. ज्योती जाधव



शिवाजी विद्यापीठीतील बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या प्रमुख असलेल्या जाधव यांनी या क्षेत्रात अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर शोधनिबंध सादर केले आहेत. शेपूच्या भाजीमध्ये कंपवात अर्थात पार्किन्सनच्या आजारावर गुणकारी ठरणारा एलडोपा हा घटक असल्याचे महत्त्वपूर्ण संशोधन, चिकनच्या पंखाचे वेगाने विघटन करणाऱ्या सूक्ष्म जीवाचे संशोधन; माती, पाणी आणि पर्यावरण यांच्या संवर्धनासाठी जैवतंत्रज्ञानाचा वापर यावरील संशोधनांवर त्यांचा भर आहे. कोल्हापूरच्या गुळाची गुणवत्ता आणि ब्रँड टिकून रहावा यासाठीच्या संशोधन प्रकल्पाच्या प्रमुख नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेसच्या सदस्य प्रोफेसर डॉ. जाधव यांच्या संशोधन कार्यामुळे त्यांना सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

12 JUL 2024 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'शिवराज'च्या विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाची शिष्यवृत्ती

**गडहिंग्लज :** येथील शिवराज महाविद्यालयाचे १४ विद्यार्थी शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती, ११ खेळाडू शिवाजी विद्यापीठ क्रीडा शिष्यवृत्ती, तर ९ विद्यार्थी जिंदाल फाऊंडेशनच्या शिष्यवृत्तीचे मानकरी ठरले. या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एकूण २ लाख ८४ हजार २०० रुपयांची शिष्यवृत्ती पटकावली.

गुणवत्ता शिष्यवृत्तीचे विभागनिहाय मानकरी असे, सायन्स विभाग- प्रियांका अर्जुनवाडे, प्रार्थना देसाई, पूर्वा देशपांडे, रेश्मा जाधव, अनुराधा कोकितकर (बी.एस्सी-भाग १). वाणिज्य विभाग- रेवती चौगुले, पीयूषा मगदूम, ज्योती माने, ऋग्वेदी नागावकर, समीक्षा पाटील, शशिकला पाटील, श्रेया झुटाळ, श्रेयस इंजल, श्वेता सावंत (बी.कॉम. भाग-१), शिवाजी विद्यापीठ स्पोर्टस् स्कॉलरशिप मानकरी- रोहन रंडे, शुभम शिदनाळे (कुस्ती), विवेक मोरे, ओमकार पन्हाळकर, श्रुती रेडेकर (क्रॉसकंट्री), रोहिणी पाटील (ॲथलेटिक्स), श्रुती चौगुले, आरती जाधव (कयाकिंग), आदित्य अनगळ, धनंजय जाधव, अमृता तराळ, (फेन्सिंग), जिंदाल फाऊंडेशनच्या शिष्यवृत्तीचे मानकरी- अनुराधा देसाई, तेजस्विनी हगलदिवटे, श्वेता कदम, वेदिका पाटील (बी. सी.ए. भाग-एक), अनुराधा देसाई, अस्मिता चव्हाण (बी.एस्सी भाग-२), स्नेहा वाघ (बी. कॉम. भाग-२), शशिकला पाटील, स्नेहल पोवार (बी.कॉम. भाग-१), निकिता पाटील (एम.एस्सी.भाग-१).

विद्यार्थ्यांना शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसन कुराडे, सचिव डॉ. अनिल कुराडे, उपाध्यक्ष ॲड. दिग्विजय कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांचे प्रोत्साहन लाभले. यासाठी डॉ. राहुल मगदूम, डॉ. संतोष शहापूरकर, नेताजी कांबळे यांनी पाठपुरावा केला.

जनसंपर्क कक्ष

12 JUL 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'एका लोकलढ्याची यशोगाथा 'मुळे चळवळीचा सन्मान

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

श्रमिक मुक्ती दलाचे राज्य निमंत्रक कॉ. संपत देसाई यांनी लिहिलेल्या 'एका लोकलढ्याची यशोगाथा' या पुस्तकाचा समावेश शिवाजी विद्यापीठाने अभ्यासक्रमात करून चळवळीचा सन्मान केला आहे. ही बाब निश्चितच अभिमानास्पद आहे, असे गौरवोद्गार विविध मान्यवरांनी गडहिंग्लज येथे काढले.



**गडहिंग्लज : संपत देसाई यांचा सत्कार करताना अंजना रेडेकर, गोपाळ पाटील, विद्याधर गुरबे, रियाज शमनजी यांच्यासह अन्य.**

देसाई यांच्या पुस्तकाचा शिवाजी विद्यापीठाने नुकताच बीए भाग-तीन मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात समावेश केला आहे. याबद्दल गडहिंग्लज येथे देसाई यांचा सत्कार करण्यात आला. अमरसिंह चव्हाण, प्रा. सुनील शिंत्रे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी गोपाळराव पाटील, श्रीमती अंजनाताई रेडेकर, विद्याधर गुरबे, नितीन पाटील, शिवप्रसाद तेली, संजय तर्डेकर, रियाज शमनजी, शिवाजी माने, राजू रेडेकर, युवराज पोवार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUL 2024

तरुण भारत

# विद्यापीठात उद्या ज्वेलरी डिझाईनिंगवर कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात १३ रोजी सकाळी ११ वाजता कॅड/कॅम व थ्रीडी प्रिंटींग तंत्रज्ञान वापरून ज्वेलरी डिझाईनिंगची एकदिवसीय कार्यशाळा आहे. तंत्रज्ञानं अधिविभागाचे इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल, हुपरी चांदी हस्तकला उद्योग विकास फौंडेशन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजेस् आणि एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा आयोजित आहे. तंत्रज्ञान अधिविभागाच्या सभागृहात उद्घाटन होईल